
Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

फेब्रुवारी २०१८

Peer Reviewed International Research Journal

# VIDYAWARTA®




## मानव्यविद्या शाखेंतर्गत आंतरविद्याशाखीय

# संशोधनाची नवता आणि परिणामकारकता

(Innovative and Effective Intra-disciplinary Research in Humanities)

डॉ.जयवंत भदाणे
संयोजक व विभाग प्रमुख

प्राचार्य हितेंद्र आहेर
निमंत्रक

Scanned by CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

# || Index ||

01) Interdisciplinary Research : A holistic approach
V. R. Bhagwat, K. V. Bhagwat, DHULE || 10

02) Interdisciplinary Research : An Essential Driver for Innovation
Adv. Dr. Neeta Deshpande, Sangli || 16

03) Capital Formation in Indian Agriculture : Bankers Obligations
Mr. Dnyaneshwar V. Gore, Buldana, Dr. G. Parameshwari, Karnataka || 19

04) Farmers Suicide in India: Psycological Analysis
Dr. Bhausaheb Y. Deshmukh, Ahmednagar || 23

05) An Interdisciplinary Legal Research: Scope and Challenges
Mr. Sunny S Hasani, Nandurbar || 27

06) Migration - Causes and Consequences
Mrs. Neeta.M.Kedar, Nashik Dr.P.V.Sathe, Pune || 30

07) Exploring innovative research avenues in WhatsApp messages
Dr. Premji Parmar, Nashik || 32

08) Comparison of Traditional Media with Electronic Media
Dr. Rajendra L. Kable, Aurangabad || 35

09) E-Commerce in India
Dr. Rajesh B. Lahane, Aurangabad || 40

10) Research Paper Writing Techniques : A Study
Dr. Vijaykumar Wawle, Nashik || 45

11) FOOL POOL COOL A Journey from Bitter to Sweet via Vidura Neeti
Shri Raghuttam Arjunagi, Vijayapur || 49

12) Systematic Investment: A study on Mutual Fund Portfolio
Vanshika V. Ahuja, Bharati S. makhijani, Mumbai || 51

13) Women Empowerment and Social Security through "Self Help Group"
Prin. Dr. Atul. H. Salunke, Raigad || 55

14) Urban Local Governments with reference to the 74th Constitutional Amendment Act, 1992
Prof. Sonawane Arun Baburao, Dr.S.K.Pagar, Nashik || 57



Scanned by CamScanner

45) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श जीवनचरित्र
**Prof. Murlidhar S. Nakade, Bhandara** || 152

46) जमातवादाचे राजकारण : राष्ट्र निर्माणास घातक
**प्रा डॉ विशाल प्रकाश लिंगायत, जि सोलापूर** || 156

47) शेतकरी आत्महत्या : मानसशास्त्रीय विश्लेषण
**डॉ.विजय एच.नागरे, जि.बुलढाणा** || 158

48) मानवी स्थलांतर : स्थिती व गती
**प्रा. एन. के. आहेर, जि.नाशिक.** || 162

49) मानवी हक्क आणि भारतीय महिला
**प्रा. अपर्णा मल्लिनाथ गुरव, वेळापूर** || 165

50) आंतरविद्याशाखीय संशोधन आणि सामाजिकशास्त्रे : परस्परसंबंध
**कु. स्वाती रामदास शिंगणे, बुलडाणा** || 167

51) विमुद्रीकरण : भारतीय अर्थव्यवस्था
**Prof. Ramdas Trimbak Tuplondhe, Nashik.** || 169

52) संत चोखामेळा यांचे साहित्यातील समाजशास्त्रीय विचार
**प्रा. दादा पंढरीनाथ साठे, वेळापूर** || 171

53) सामाजिक शास्त्रातील आंतरविद्याशाखीय संशोधन विषयक माहितीचे विश्लेषण
**डॉ. डी. ए. सोनवणे, अभोणे** || 172

54) शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मानसिक विश्लेषण
**प्रा. डॉ. सी. पी. साखरवाडे, ज.नगर** || 175

55) हवामान बदल : शेती व्यवस्थापन
**प्रा. किशोर पवार, नाशिक** || 176

56) निर्धनीकरणाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांवरील आर्थिक परिणाम
**प्रा. डॉ. सोनवणे बी. एम., नाशिक.** || 179

57) मानवमुक्ती चळवळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**प्रा. व्ही. डी. काकविपुरे, नाशिक** || 181

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

**46**

# जमातवादाचे राजकारण : राष्ट्र निर्माणास घातक

**प्रा डॉ विशाल प्रकाश लिंगायत**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
एस बी झाडबुके महाविद्यालय, बार्शी, जि सोलापूर

---

भारतीय राज्यघटनेत आलेल्या उल्लेखानुसार भारतातील हिंदूधर्मियांव्यतिरिक्त इतर सर्वच स्वतंत्र, धार्मिक अधिष्ठान लाभलेल्या धर्मियांना, धर्मांच्या अनुयायांना (A separate religioes identity) अल्पसंख्यांक असे म्हणता येईल म्हणजेच भारतीय धार्मिक अधिष्ठान असलेल्या मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, जैन, बौद्ध, पारसी हे सर्व धर्मीय अल्पसंख्यांक म्हणून मानले जातात. धर्म, जात, प्रदेश, भाषा, वंश यापैकी कोणत्याही आधारावर समाजाचे बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक अशी विभागणी होऊ शकते. "बहुसंख्यांक गटाच्या हातून अल्पसंख्यांकांवर होऊ शकणा-या अन्याय-अत्याचारापासून जर अल्पसंख्यांकांना संरक्षण मिळाले नाही तर एकजीनसी समाजरचनेच्या दृष्टिने ते योग्य होणार नाही."[१] समाजाच्या विकासास ते घातक ठरेल. अल्पसंख्यांक हा भारतीय राजकारणात आणि एकंदरीत भारतीय समाज व्यवस्थेत उपयोजीला जाणारा जणू एक परवलीचा शब्द बनलेला आहे. अल्पसंख्यांक हा नेहमीच अतिशय प्रचलित असलेला, नेहमी वापरला जाणारा पण काहीसा वादग्रस्त ठरत आलेला असा शब्द आहे. सामान्यपणे अल्पसंख्यांक या शब्दाचा असा अर्थ घेतला जातो की, अल्पसंख्यांक म्हणजे असा समाज असा धर्म, किंवा अशी जात की, ज्याची लोकसख्यां ५० टक्के पेक्षा कमी आहे. भारतीय राज्यघटनेत अल्पसंख्यांक ही संकल्पना अतिशय विस्ताराने स्पष्ट केली आहे. अल्पसंख्याक म्हणजे कोण? अल्पसंख्यांक कोणास म्हणता येईल? तर इसवी सन १९४७ मध्ये आपल्या देशाला स स्वातंत्र्य मिळाले आपल्या देशाची दोन विभागात फाळणी झाली तेव्हा स्वतःस अल्पसंख्यांक म्हणून संबोधल्या गेलेल्या समाजाने आपले स्वतंत्र राष्ट्र उभारले. तेव्हापासूनच अल्पसंख्यांकांचा प्रश्न चिंतेचा आणि चिंतनाचा बनलेला दिसून येतो. जेव्हापासून अल्पसंख्यांक या शब्दाचे राजकारण केले जाऊ लागले तेव्हापासून ते आजतागायत त्याचे सगळयात जास्त धोकादायक असे स्वरूप जगासमोर आले आहे. त्यामूळेच जमातवादाचे राजकारण ही आज देशापूढील एक गंभीर समस्या बनली आहे. आर्थिक स्वरूपातील लाभासाठी त्याचा फार मोठया प्रमाणात वापर होऊ लागला आहे. लोकशाहीत तर अल्पसंख्यांक हा शब्द मतांचे चलनी नाणे बनला आहे. जमातवादाचे राजकारण करून राजकारणी मंडळी आपले हित साध्य करत आहेत. या राजकारणी मंडळींनी केवळ आपल्या फायद्यासाठी त्याचे विपर्यस्त स्वरूप पूढे आणले आहे. सत्तेच्या भागीदारीसाठी, कुठल्यातरी आर्थिक लाभासाठी, उच्च पदावर पोहचण्यासाठी, आपल्या हितसंबंधांना जपण्यासाठी हा शब्द जणू सरळ-सरळ एखाद्या शिडीप्रमाणे वापरला जाऊ लागला आहे. भारतीय राजकारणात विषेशतः महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर जमातवादाचे राजकारण व अल्पसंख्यांकांचा प्रभाव हा नकारात्मक दिशेने मोठ्या प्रमाणात वाढू लागला आहे. त्याचे अगदी कालपरवाचे उदाहरण सांगायचे झाले तर अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी सारख्या घटना वारंवार घडतांना दिसत आहेत. तसेच भीमा कोरेगाव येथील घटना ही सद्यस्थितीतील अगदी ताजे उदाहरण आहे. आणखी एक उदाहरण सांगायचे झाल्यास लोकसत्ता या दैनिकातील दिनांक "९ जानेवारी, २०१३ च्या बुधवारच्या अंकातील बातमीचे सांगता येईल. या [illegible][२] अशा स्वरूपाचा मथळा असलेले बातमी वाचल्यावर व कालपरवाच्या दोन-चार घटनांचा संदर्भ बघितल्यावर याबद्दलचे विचारमंथन सुरू झाले. ओवेसी हा नेमका कोण? तर प्रक्षोभक भाषणामूळे वादग्रस्त ठरलेल्या मजलीस-ए-इत्तेहादूल-मुसल्मीनचे ते आमदार आहेत. त्यांच्या राजकीय पक्षाचे एकूण ११ नगरसेवक हे स्थानीक पातळीवर निवडून आले होते. त्यांचे बंधू असुद्दीन ओवेसी हे खासदार आहेत व स्वतः अकबरूद्दीन ओसेवी हे आमदार आहेत. तेलंगानातील ऑल इंडिया मजलीस ए मुसल्मीन (MIM)या राजकीय पक्षाचे हे दोघे प्रमुख नेते आहेत. या व अशा प्रकारच्या संघटना व राजकीय पक्षांना सरकारने जर वेळीच पायबंद घातला नाही तर अशा अनिष्ठ प्रवृत्ती संपूर्ण देशभर पसरण्यास वेळ लागणार नाही. अशा व्यक्तिंची विचारसरणी, त्यांचे राजकारण, त्यांचे धोरण हे हाताश मध्यमवर्गीय तरूणांना, बेरोजगारांना नेहमीच आकर्षित करणारे ठरते. त्यामूळे मोठ्याप्रमाणात हा तरूण वर्ग अशा संघटनांमध्ये सामिल होतो. उदाहरणार्थ सीमी सारखी संघटना, बजरंग दल सारखी संघटना आपल्या प्रत्येक अडचणींचे, समस्यांचे मूळ भाषिक अल्पसंख्यांकांच्या वर्चस्वातच आहे. तसेच जमातवादाच्या राजकारणातच आहे, अशी त्यांचे खात्री पटते.

अल्पसंख्यांकांचे हक्क, धोरण, त्यांचे अधिकार व सवलती इत्यादी गोष्टींचा विचार करतांना त्याची चिकित्सा करतांना भारतीय राजकारणात जमातवादाचे राजकारण म्हणून नेहमीच होतांना दिसते



Scanned by CamScanner

अस्तित्वात होते तेव्हा गुजराती विरूद्ध मराठी असा झालेला संघर्ष, तेलगु भाषावादी प्रांतासाठी तेलंगना या राज्य निर्मितीचा प्रश्न या प्रश्नासाठी उसळलेल्या हिंसक आंदोलनातून झालेली या राज्यांची निर्मिती मास्टर तारासिंग यांनी भाषेच्या आधारे केलेली पंजाब सुभ्याची मागणी, आसाममधील बंगाली भाषिकांचा प्रश्न, महाराष्ट्रातील मराठी व अमराठी बाबातचा प्रश्न ही सर्व उदाहरणे लक्षात घेतल्यास एक गोष्ट निर्विवाद आहे की, "भाषिक निष्ठा, प्रादेशिक अस्मिता ही राष्ट्र निष्ठेपेक्षा अधिक श्रेष्ठ ठरू पाहते आहे."[५] ही बाब अधिक चिंताजनक व तेवढीच गंभीर आहे. भाषेच्या आधारे राज्या-राज्यातील वाद, तंटे व दंगे होतात. राष्ट्रभाषेच्या प्रश्नावरून दक्षिण व उत्तर भागातील राज्ये परस्परांविरूद्ध उभी राहतात, एकमेकांच्या भावनीक प्रश्नांना डिवचले जाते. जमातवादाच्या राजकारणात या सगळयांचा आपल्या राष्ट्रीय एकात्मतेला फार धोका निर्माण होतो आहे. लोकांना आपल्या देशापेक्षा आपला प्रदेश आपले राज्य अधिक प्रिय होऊ लागले आहे. उदाहरणार्थ महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद, मोदींचा गुजरात महिमा. या राज्यांतील हे तंटे व वाद-विवाद जो पर्यंत सुरू राहतील तो पर्यंत जमातवादाचे राजकारण असेच सुरू राहणार परंतु राष्ट्राच्या एकात्मतेच्या दृष्टिने हे फारच हानीकारक ठरणारे आहे. त्यादृष्टिने सकारात्मक दृष्टिकोणातून आजच्या राजकीय नेत्यांचे पाहण्याचे इच्छाच नाही. स्वतःचा स्वार्थ, अहंभाव हाच त्यांचा एकमेव राजमार्ग बनू पाहत आहे. हीच आजच्या अखंड भारतासमोरची प्रमुख समस्या बनली आहे.

**संदर्भ -**

१. डॉ भोळे भा. ल., 'भारतीय राज्यव्यवस्था', पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर, पृ. २९४

२. दै. लोकसत्ता, दिनाक ९ जानेवारी, २०१३, बुधवार, पृ. १

३. डॉ भोळे भा. ल. उनि,१ पृ. २९७

४. हूसैन मुजफ्फर, 'अल्पसंख्यांक वाद : एक धोका', चंद्रकला प्रकाशन, पूणे, पृ ६७

५. डॉ भोळे भा. ल. - डॉ. ना.र. देशपांडे, 'भारताचे शासन आणि राजकारण', पायल प्रकाशन, नागपूर, पृ. ४६२

❑❑❑

47

# शेतकरी आत्महत्या : मानसशास्त्रीय विश्लेषण

डॉ.विजय एच.नागरे
प्राचार्य एन एन महाविदयालय
दुसरबिड सिदंखेडराजा जि.बुलढाणा

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजाचा अभ्यास करताना प्रारंभिक समाजव्यवस्था स्वंयपुर्ण असल्याचे दिसुन येते.हजारो वर्षांचे ऐतिहासिक पुरावे देशातील समाजाच्या शाश्वत प्रगतीचे संदर्भ देतात.भारतात उत्पादीत वस्तु व सेवाच्या आधारावर येथील समाज आपल्या गरजा पुर्ण करत असल्याचे आढळुन येते.पुर्वी पासुनच भारतीय ग्रामिण समाज हा अर्थव्यवस्थेचा व ग्रामिण जीवनाचा कणा असल्याची अनुभुती येते.कृषीवर आधारीत अर्थव्यवस्था असलेल्या जगातील मोजक्या देशामध्ये भारत अग्रस्थानी असल्याचे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. औदयागिक क्रांतीनंतर सर्व जगात महत्वपुर्ण परिवर्तन घडुन आले.या परिरवर्तनाच्या लाटेतुन भारतीय अर्थव्यवस्था तग धरु शकली नाही. स्वांतत्र्योत्तर काळात औदयोगिकीकरण मोठया प्रमाणात झाले व बहुअंशी औदयागिकीकरणाला यश सुध्दा प्राप्त झाल्याचे आपणास चित्र दिसते आहे.जागतिक स्थरावर औदयागिक क्रांतीत बदल झाल्याने मुबलक प्रमाणात उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे गरजांची पुर्तता होऊन उत्पादीत उर्वरित माला बाजार पेठ उपलब्ध करण्याच्या हेतुने १९९५ मध्ये जागतीक व्यापार संघटनेची स्थापना झाली.या संघटनेवर अमेरिका जपान युरोप इत्यादी देशाचे प्रभुत्व होते. या संघटनेचे सदस्यत्व जवळपास १३५ देशांनी स्विकारले.जागतीक व्यापार संघटनेच्या लाभ-हितासाठी,आर्थिक सबलता असलेल्या विकसित देशांना झाला.अविकसित विकसनशिल देशामध्ये औदयोगिक विकास झालेला नसल्याने तेथे निर्यातक्षम वस्तुचा तुटवडा असल्यामुळे हे देश वस्तुची निर्यात करण्यास असमर्थ ठरले त्यामुळे त्यांना तोटा सहन करावा लागला.

उदारीकरणामुळे ग्रामिण भागातील समाज रचनेमध्ये बदल होवुन शहरी जीवनाकडे बघण्याच्या हेतुत निर्माण होऊन ग्रामिण भागातुन शहरी भागाकडे स्थंलातरास सुरवात झाल्याचे चित्र दिसते, त्यामुळे ग्रामिण भारतामध्ये याचा विपरीत परिणाम झाला उदारीकरणामुळे आयात मोठया प्रमाणात होवुन ग्रामिण भागातील लघु व कुटीरोदयोगामध्ये काम करणाऱ्या श्रमिकांवर त्याचा परिणाम झाला,



Scanned by CamScanner